निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७५ वा.
मंगळवार :०९ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## सुधाकर तेलंग यांना राज्य सेवा हक्क आयुक्त (पुणे) पदाची शपथ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांनी सुधाकर बापूराव तेलंग यांना महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग आयुक्त, पुणे या पदाची शपथ दिली.या कार्यक्रमास कोकण विभागाचे आयुक्त बलदेव सिंग, माजी आयुक्त दिलीप शिंदे, सचिव वैशाली चव्हाण, तसेच माजी जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर उपस्थित होते. निवृत्त वरिष्ठ अधिकारी उदय पाटील आणि भगवान गावडे यांनीही नवीन आयुक्तांचे अभिनंदन केले. माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी आयुक्त तेलंग यांचे स्वागत करत, आयोगाच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन केले.

# संत जगनाडे महाराजांनी संत तुकाराम महाराजांचे विचार सर्वदूर पोहोचविले - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/प्रतिनिधी/** काही रुढीवादी लोकांनी संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात बुडविल्या, मात्र संत जगनाडे महाराज यांनीच त्या गाथा वाचवून तुकाराम महाराजांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कौशल्य विकास विभागांतर्गत रामदासपेठ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचे नाव देण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, माजी खासदार रामदास तडस अतिथी म्हणून उपस्थित होते.

भक्ती संप्रदाय, वारकरी परंपरा ही महाराष्ट्राची ओळख असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारकरी संप्रदायाने उच्च-नीच भाव संपवून अवघा महाराष्ट्र एक केला. या मालिकेत संत जगनाडे महाराज यांचे कार्य अतिशय मोठे आहे. समाजातील मनुष्यता जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना महापुरुषांची नावे देण्याच्या



उपक्रमाचीही मुखमंत्र्यांनी प्रशंसा केली.मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थेच्या विद्यार्थिनींनी यावेळी लेझीम नृत्य सादर केले. संत जगनाडे महाराज यांच्या वेशभूषेत सर्वांचे सहभागी विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## संक्षिप्त

### जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची प्रारुप मतदार यादी दिनांक ०३.१२.२०२५ रोजी प्रसिध्दी झालेली आहे. सदर यादीवर दिनांक ०३.१२.२०२५ ते १८.१२.२०२५ या कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत व त्यासाठी मतदान केंद्रनिहाय पदनिर्देशीत अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. नियुक्त अधिकारी यांना दावे व हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत कार्यालयीन वेळेत सदर मतदान केंद्राच्या ठिकाणी उपस्थित राहून अर्ज स्विकारण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. दिनांक ०६.११.२०२५ ते ०२.१२.२०२५ या कालावधीत ऑनलाईन व ऑफलाईन जे अर्ज प्राप्त झालेले आहेत ते सर्व अर्ज आता दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत डाटाएन्ट्री करुन निकाली काढण्यात येणार आहेत.

महिला मतदारांकडे नावातील बदलाच्या संदर्भात आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व आवश्यकतेनुसार गृहचौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रारुप मतदार यादीच्या तपासणी मध्ये आढळून आलेल्या त्रुटी तपासून या त्रुटींची नियमानुसार तात्काळ दुरुस्ती करण्याच्या सूचना सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

मतदार नोंदणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत सुरु असते. अर्ज दाखल करण्याकरीता ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दती चालु रहाणार असून मतदार नोंदणीचा ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यास कोणीही नकार देवू नये, असे निर्देश क्षेत्रीय स्तरावरील सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

लोकशाही प्रक्रीयेत सहभाग नोंदवून जास्तीत जास्त नाव नोंदणी करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

### विभागीय लोकशाही दिनात चार अर्ज निकाली

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विभागीय लोकशाही दिनात मागील विभागीय लोकशाही दिनातील १५ प्रलंबित अर्जांपैकी ०४ अर्ज निकाली काढण्यात आले. तसेच आजच्या लोकशाही दिनात प्राप्त ०२ नवीन अर्जावर व उर्वरित ११ प्रलंबित अर्जांवर संबंधित विभागाने नियमांनुसार कार्यवाही करून अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसिलदार के.के.भदाने यांनी दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या विभागीय लोकशाही दिनात नायब तहसीलदार गजानन नांदगावकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# तुकाराम मुंढेंच्या नावाने धमकी, भाजप आमदार कृष्णा खोपडेंची पोलिसांत धाव

आत्ताच एक्सप्रेस

नागपूर /प्रतिनिधी/ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याविरुद्ध भाजप आमदार विधिमंडळ अधिवेशनात आवाज उठवणार असून त्यांच्या निलंबनाची मागणी करणार असल्याचे समोर आले. यासंदर्भात एबीपी माझाने वृत्त दिल्यानंतर, तुकाराम मुंडे प्रकरणी लक्षवेधी मांडून त्यांना निलंबित करण्याची मागणी करणारे भाजप आमदार कृष्णा खोपडे यांना धमकीचे दोन कॉल आल्यानंतर कृष्णा खोपडे यांनी नागपूर पोलिसांकडे त्याची तक्रार केली आहे. या तक्रारीत फोनवरुन धमकी देणाऱ्या व्यक्तीचा मोबाईल नंबर आणि नावही त्यांनी लिहून दिलं आहे. तुम्ही तुकाराम मुंढेंविरुद्ध का बोलत आहात, त्यांच्या निलंबनाची मागणी तुम्ही का करत आहात? असे प्रश्न विचारत संबंधित फोनवरील व्यक्तीने आमदार खोपडे यांना धमकी दिली होती.




मुख्यमंत्री कार्यालय, विधानसभा अध्यक्ष कार्यालय याशिवाय कृष्णा खोपडे यांनी नागपूरचे पोलीस आयुक्त तसेच स्थानिक सीताबर्डी पोलीस स्टेशनमध्ये धमकीच्या कॉलसंदर्भात तक्रार दाखल केली आहे. तुकाराम मुंडे यांच्या विरोधात कारवाईची मागणी केल्यानंतर मला पाहून घेण्याची धमकी आणि शिवीगाळ करणारे फोन कॉल येत असल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. ज्या दोन फोन क्रमांकावरून धमकीचे कॉल आले, ते दोन्ही नंबर पोलिसांना देत कृष्णा खोपडे यांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे. विशेष म्हणजे भाजप आमदार हिवाळी अधिवेशनात तुकाराम मुंडे यांच्या विरोधात लक्षवेधी मांडून नागपूरात नियमबाह्य पद्धतीने स्मार्ट सिटीचा कार्यभार बळकावून आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी आणि महिला अधिकाऱ्यांशी दुर्व्यवहार केल्याप्रकरणी कारवाईची मागणी करणार आहे, अशी बातमी एबीपी माझाने दाखविली होती. त्यानंतर, आपणास दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास फोनवरुन धमकी आल्याचं आमदार खोपडे यांनी म्हटलं आहे.

तुकाराम मुंडेंच्या नेतृत्वात पार्थ पवार प्रकरणाची चौकशी करावी

दरम्यान, तुकाराम मुंढेंच्या संदर्भातील तक्रारीवरुन काँग्रेस नेते आक्रमक झाले असून आमदार नाना पटोले यांनी थेट पार्थ पवार यांच्या प्रकरणाशी तुलना करत मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात चौकशी समिती गठित करावी, असं आव्हान काँग्रेस नेते नाना पटोले यांनी दिलं आहे. तसेच, पार्थ पवार प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी विकास खारगेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. या पद्धतीच्या चौकशीचा आणि कमिटीचा फार्स करून जनतेची जी दिशाभूल चाललेली आहे. महाराष्ट्र रोज लुटण्याचं काम सुरू आहे. तुमच्यात खरोखरच हिंमत असेल आणि 'दूध का दूध पाणी का पाणी' करायचं असेल तर, तुकाराम मुंढेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी बसवा.

## कष्टकऱ्यांसाठी लढणारे ज्येष्ठ समाजवादी नेते बाबा आढाव यांचं निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे /प्रतिनिधी/** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी आणि कामगार नेते बाबा आढाव यांचे आज रात्री ८ वाजून २५ मिनिटांनी निधन झाले, ते ९५ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून ते आजार होते, त्यांतच त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वीच, शरद पवार हे बाबा आढावांच्या भेटीला रुग्णालयात गेले होते. पुना हॉस्पिटलमध्ये बाबा आढाव यांच्यावर उपचार सुरु असताना त्यांनी रुग्णालयात जाऊन विचारपूस केली होती. तर, गेल्याच आठवड्यात ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांचे निधन झाले होते. तेव्हाही शरद पवारांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पन्नालाल सुराणा यांच्या कार्याची आठवण काढत त्यांना आदरांजली वाहिली होती.

बाबा आढाव यांना गेल्या १० ते १२ दिवसांपासून पुना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले होते. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर आवश्यक ते उपचार सुरू होते. उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितल्यानुसार त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना आय.सी.यू. मध्ये ठेवण्यात आले होते. अखेर, आज रात्री ८.२५ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने कष्टकऱ्यांसाठी लढणारा, समाजवादी विचारांचा नेता महाराष्ट्राने गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, बाबांचे पार्थिव उद्या सकाळी १० वाजता हमाल भवन मार्केटयार्ड येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येईल. सायंकाळी ४ ते ५ च्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात येतील.

कोण आहेत बाबा आढाव?

१९७० च्या दशकात डॉ. बाबा आढाव पुणे महापालिकेचे नगरसेवक होते. तात्कालीन समाजवादी पक्षाचे सदस्य होते आणि रिक्षा पंचायतीने नेते म्हणूनही काम करत होते. 'एक गाव एक पाणवठा' नावाची मोहिम चालवली जात होती.

## दैनिक आत्ताच एक्स्प्रेसचा दणका

# फुलंब्री नगरपंचायतीकडून पिरबादी पुलाजवळील घाणेची सफाई

**आत्ताच एक्सप्रेस**


**फुलंब्री/ प्रतिनिधी /** फुलंब्री नगरपंचायतीकडून पिरबादी पुलाजवळील परिसरातील घाण तातडीने साफ करण्यात आली असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गांभीर्याने घेतल्याचे चित्र दिसून आले आहे. हजरत बाहोद्दीन बाबा दर्गाहजवळील पिरबादी पुलाजवळ गेल्या काही दिवसांपासून प्रचंड दुर्गंधी व अस्वच्छता निर्माण झाली होती. पावसाचे पाणी, साचलेला कचरा आणि वाहून येणाऱ्या सांडपाण्यामुळे परिसरात असह्य वास निर्माण होऊन नागरिकांच्या रोजच्या ये-जा करण्यात अडचणी येत होत्या.दिनांक ६ डिसेंबर रोजी दैनिक आनंद नगरीने पिरबादी पुलाजवळ दुर्गंधी, पुलाला कठडे नाही; नागरिकांचे आरोग्य धोक्यात अशी बातमी प्रकाशित केली होती. या वृत्तानंतर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक ज्ञानेश्वर ठोंबरे यांनी लगेच दखल घेत संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना निर्देश दिले. निर्देशानुसार सफाई विभागाने सकाळीच पथक पाठवून पुलाजवळील परिसरातील कचरा, गाळ, प्लास्टिक आणि दुर्गंधी निर्माण करणारा जमा कचरा पूर्णतः साफ केला.

सध्या फुलंब्री नगरपंचायतीच्या निवडणुकीची धामधुम सुरू आहे. शासन, प्रशासन तसेच उमेदवार विविध कार्यक्रमांमध्ये गुंतले असतानाही नागरिकांच्या आरोग्यासंबंधीच्या तक्रारीला नगरपंचायतीकडून तातडीने प्रतिसाद मिळाल्याने स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. परंतु, केवळ घाण साफ केल्याने प्रश्न पूर्ण सुटत नाही, अशी




भावना नागरिकांमध्ये आहे.

पिरबादी पूल हा दर्गाह परिसराच्या मुख्य मार्गावर असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. पुलाच्या साईडला सुरक्षात्मक लोखंडी कठडे नसल्याने अपघाताची शक्यता कायम आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशाची अपुरी व्यवस्था, अरुंद जागा आणि वाहतुकीचा दबाव यामुळे हे ठिकाण अधिक धोकादायक ठरते. अनेक वेळा पावसाळ्यात पाण्याचा वेग वाढल्याने पुलाच्या बाजूने पाणी वाहते, अशा स्थितीत लोखंडी पाइप किंवा सुरक्षा जाळी नसल्यामुळे जीवितहानीची शक्यता नागरिकांनी वारंवार व्यक्त केली आहे.




नागरिकांच्या या मागणीबाबत शाकेर इसाक पटेल (निवासी - फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद) यांनी सांगितले की,

नगरपंचायतीने घाण साफ केली ही चांगली गोष्ट आहे, पण समस्या परत निर्माण होणार नाही याची हमी देणेही आवश्यक आहे. पुलावर लगेच लोखंडी पाइप किंवा जाळी बसवावी, कारण हा प्रश्न नागरिकांच्या सुरक्षेशी आणि जीवितहानीच्या धोक्याशी संबंधित आहे. याबाबत आम्ही नगरपंचायतीला स्वतंत्र निवेदन देणार आहोत.पुढील काही दिवसांत नगरपंचायतीने पुलावर सुरक्षायंत्रणा बसविण्याचे काम हाती घेणार का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. नागरिकांचा स्पष्ट आग्रह आहे की, फक्त साफसफाईपुरते मर्यादित न राहता दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, जेणेकरून दर्गाह परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि रहदारीसाठी सुलभ राहील.

# कन्नड वनविभागाची धडक कारवाई; अवैध लाकडाने भरलेला ट्रक जागेवरच जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/**उदय कुलकर्णी/कन्नड विभागाचे (प्रादेशिक) वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. शिवाजी टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाने मोठी कारवाई करत अवैध परवानगी किंवा पावतीबाबत चालकाकडे कोणतेही अधिकृत कागदपत्र उपलब्ध नसल्याने ट्रक जागेवरच जप्त करण्यात आला.

एमएच-०४ जीएफ-२०८० या क्रमांकाच्या ट्रकमध्ये सुमारे ७ ते ८ टन लाकूड असून



लाकडाने भरलेला ट्रक जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वनपाल के. आर. जाधव, वनरक्षिका सौ. उज्वला सोनवणे, दिपाली साळवे, वनसेवक अशोक आव्हाड, सय्यद शेख मकसूद तसेच वाहनचालक भाऊसाहेब वाघ आणि अन्य सहकारी हे रात्री गस्त घालत होते. दरम्यान, कन्नड-चाळीसगाव हायवेवरील जीओ पेट्रोल पंपाजवळ ताडपत्रीने झाकलेला संशयास्पद ट्रक आढळून आला.

संशय आल्याने पथकाने चालकाला ताडपत्री हटवण्यास सांगितले, मात्र चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पथकाने स्वतः ताडपत्री हटवून पाहणी केली असता ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात लाकूड आढळले. त्याची अंदाजे किंमत सुमारे १० लाख रुपये असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. ट्रक चालक मुद्दसर फारुख बेग (वय ३५, रा. मालेगाव, जि. नाशिक) याला ताब्यात घेऊन त्याच्यावर भारतीय वनअधिनियम १९२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. शिवाजी टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल कैलास जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांमार्फत सुरू आहे. प्राथमिक तपासात हा ट्रक मालेगाव येथील व्यापाऱ्याचा असल्याचे दिसून आले आहे.या धडक कारवाईमुळे अवैध वृक्षतोडीचे आणि लाकूड वाहतुकीचे धंदे करणाऱ्या टोळक्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भारत रशिया दृढ मैत्री

रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांचा दोन दिवसांचा ऐतिहासिक भारत दौरा नुकताच पार पडला. पुतिन यांच्या या भारत दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. युक्रेन रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर आणि अमेरिका - भारत यांचे संबंध दुरावल्यानंतर पुतिन यांचा हा पहिलाच दौरा असल्याचे या दौऱ्याकडे अमेरिकेसह संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. पुतिन यांच्या या दौऱ्याकडे अमेरिकेचे विशेष लक्ष होते मागील काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला होता अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला त्याचाच परिपाक म्हणजे पुतिन यांचा भारत दौरा. पुतिन यांनी भारताचा दौरा करून दोन्ही देशातील मैत्रीचे संबंध दृढ असल्याचेच सिद्ध केले. या दौऱ्यात दोन्ही देशांदरम्यान महत्वाचे करार करण्यात आले. पुतिन भारत दौऱ्यावर आता आले असले तरी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन हे फोनवरून सातत्याने एकमेकांशी संवाद साधून चर्चा करतच होते. ऑगस्ट महिन्यात भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ती भेट झाली होती. एस जयशंकर यांनी त्या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली त्या भेटीत अनेक विषयावर चर्चा केली मात्र त्या भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. त्या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला होता. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र पुन्हा एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. या दोन्ही महासत्ता पुन्हा एकत्र आल्या तर त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. पुतिन यांच्या भारत दौऱ्यानंतर भारत रशिया या दोन जुन्या मित्रांमधील मैत्रीचे संबंध दृढ झाले आहेत हे मात्र नक्की.

## नादरपुर येथील जि.प्र शाळेत जागतिक दिव्यांग सप्ताह साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील जागतिक दिव्यांग सप्ताह उत्साहात साजरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नादरपुर केंद्र नाचनवेल जागतिक दिव्यांग सप्ताह साजरा करण्यात आला यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या तसेच त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले विविध क्रीडा स्पर्धांचे यावेळी आयोजन करण्यात आले यासाठी विशेष शिक्षक उत्तम आघाडे पंचायत समिती कन्नड तसेच शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र पाटील रामहरी निकम सुनिल जाधव जगन्नाथ कोंडके पोपट जंगले संतोष घोडके कारभारी जंगले या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले व महत्त्वाची भूमिका बजावली या वेळी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष शालेय व्यवस्थापन सर्व सदस्य अध्यक्ष उपाध्यक्ष उपस्थित होते.छायाचित्र सुनिल निकम

# जि.प. हायस्कूल करखेली येथे बाबासाहेबांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद/गंगाप्रसाद सोनकांबळे/** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा परिषद हायस्कूल, करखेली येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास धर्माबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माधव कोळेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक वेंकट लोलम यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले.

पोलीस निरीक्षक माधव कोळेकर यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व समजावून सांगत शैक्षणिक प्रगतीसाठी शिस्तीची गरज अधोरेखित केली. तसेच संकटसमयी मुलींना मदत करण्यासाठी पोलीस सदैव तत्पर असतील असे आश्वासन त्यांनी दिले.यानंतर सुप्रिया



कोलाकट्टे, स्वाती सोनकांबळे आणि अर्पिता येसलवाड या विद्यार्थिनींनी बाबासाहेबांच्या जीवन, कार्य आणि विचारांवर आधारित मनोगत व्यक्त केले. शाळेचे कलाशिक्षक श्री. कांतराव लोखंडे यांनी स्वलिखित भीमा माझा शाळेत कसा दुडू दुडू जाय हे गीत सादर करून उपस्थितांचे मन मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाच्या समारोपावेळी मुख्याध्यापक श्री. वेंकट लोलम यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याचे आवाहन केले. तसेच शाळेच्या वेळेनंतर परिसरात होणाऱ्या भौतिक नुकसानीबाबत त्यांनी पोलीस निरीक्षक माधव कोळेकर यांना माहिती दिली आणि गस्ती दरम्यान शाळेकडे विशेष लक्ष देण्याची विनंती केली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक संतोष खेडकर, साईनाथ सुत्रावे, हणमंत कानगुलवार, मारुती बोंबले आणि मोहन कावडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी कु. पायल गलांडे आणि कु. दुर्गा जंगलेकर यांनी शिवकुमार पाटील सरांच्या मार्गदर्शनाखाली केले.

# बोधी दिन: मानवजागृती आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग

जगाच्या इतिहासात काही दिवस फक्त प्रसंग म्हणून नाही तर बदलांचे बिंदू म्हणून ओळखले जातात. अशा दिवसांपैकी एक म्हणजे ८ डिसेंबर बोधी दिन होय. हा दिवस केवळ बौद्ध धर्मीयांसाठी अध्यात्मिक महत्त्वाचा नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी विचार, विवेक, करुणा आणि सामाजिक न्यायाची स्मृती जागवणारा दिवस आहे.

कारण याच दिवशी राजकुमार सिद्धार्थांनी बोधी वृक्षाखाली ध्यानधारणा करत करत जीवनातील अनंत दुःख, विषमता, युद्ध, सत्ता, लोभ व अन्यायाच्या संकटांचे मूळ शोधत अखेर ज्ञानप्राप्ती केली आणि ते गौतम बुद्ध झाले. म्हणूनच बोधी दिन ही केवळ धार्मिक घटना नाही, तर मानवजातीच्या सामाजिक, नैतिक, तत्त्वज्ञानिक आणि मानवतावादी प्रवासातील एक अविस्मरणीय मैलाचा दगड आहे.

मानव समाजाच्या उत्क्रांतीत अनेकदा युद्धांनी, एकाधिकारशाहीने, साम्राज्यवादाने आणि सामाजिक जात-धर्म-वंशभेदांनी दहशत निर्माण केली. आपल्याला प्रश्न असा पडतो की मानवाला मानव बनविणारा मार्ग कोणता? शक्तीचा की प्रज्ञेचा? तर बुद्धांचे उत्तर होते की शांततेचा, नैतिकतेचा, करुणेचा, समानतेचा आणि मध्यममार्गाचा. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता बोधी दिन हा केवळ आध्यात्मिक ज्ञानाचा उत्सव नाही तर मानवी समाजाला न्याय्य, समतामूलक आणि नैतिक दिशेने प्रवास करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

इतिहासात पाहिल्यास, ज्ञानप्राप्तीपूर्वीचा सिद्धार्थ हा केवळ एखाद्या राज्यातील राजकुमार नव्हता; तो एक संवेदनशील निरीक्षक होता. मृत्यू, रोग, वृध्दत्व आणि दारिद्र्य या चार सत्यांनी त्याला हादरवले. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून हे प्रश्न आजही तेवढेच जिवंत आहेत. जग प्रगत झाले असे म्हणवले जाते, पण भूक, युद्ध, सामाजिक असमानता, मानसिक तणाव, जातीय संघर्ष, धार्मिक कट्टरता आणि उपभोगवाद-नफा-आधारित जीवनपद्धतीने मानवाला पुन्हा असहाय्य बनवले आहे. अशा काळात बोधी दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

गौतम बुद्धांच्या शिकवणीत धम्म हा कर्तव्य, नैतिकता आणि विवेक होता. त्यामुळे धम्म म्हणजे कर्मकांड, जप-तप, पुरोहिती किंवा अंधश्रद्धा नव्हे, तर समाजाला समता आणि न्याय मिळवून देणारी प्रेरणा. म्हणूनच बुद्ध म्हणतात की अप्प दीपो भव म्हणजेच स्वतःचा दीप स्वतः बना. समाजशास्त्रीय अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीने आत्मबोध, विचारमंथन आणि नैतिक धैर्य विकसित केले पाहिजे; कारण परिवर्तन हे बाहेरून लादले जाणारे नसते तर ते अंतर्मनातून जन्मते.

बोधी दिन मानव स्वभावातील तीन प्रमुख प्रवृत्तींकडे निर्देश करतो, त्यामध्ये पहिली प्रवृत्ती म्हणजे लोभ म्हणजेच अत्यंत मिळवण्याची इच्छा होय. आधुनिक समाजशास्त्र सांगते की बाजारव्यवस्था भौतिक समाधान देऊ शकते, पण ती आध्यात्मिक आणि भावनिक शांती देऊ शकत नाही. दुसरी प्रवृत्ती आहे द्वेष होय. आजही आपण पाहतो की राजकारणात, धर्मांमध्ये, समाजवर्गांमध्ये, डिजिटल माध्यमात आणि राष्ट्रांमध्ये लोकांमध्ये मतभेदांपेक्षा तिरस्कार वाढत आहे. बुद्ध म्हणतात की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेमानेच तो संपतो. तिसरी प्रवृत्ती म्हणजे अज्ञान होय.

दडपशाही, भेदभाव, हिंसा आणि कट्टरतेचा मूलाधार. समाजातील अन्याय, जातीय दमन, पितृसत्ता, वर्ण-जातिवाद, आर्थिक शोषण, पर्यावरणाचा विनाश यांची मुळे मानवी अज्ञानात आणि अविचारी कृतीत आहेत. बोधी म्हणजे हे अज्ञान दूर करण्याची प्रक्रिया होय.

म्हणूनच बोधी दिन मानवाला स्मरण करून देतो की ज्ञान म्हणजे माहिती नव्हे, तर जागृती. आज इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण आणि डिजिटल संपर्कामुळे माहितीचे जग फुलले आहे; पण शांती, श्रद्धा, मानवता आणि संयम कोठेतरी हरवले आहेत. म्हणूनच बुद्धांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय प्रश्न विचारते की आपण अधिक प्रगत झालो आहोत, की फक्त अधिक गुंतागुंतीचे आणि अस्थिर झालोआहोत?बोधी दिन आपल्याला न्यायाच्या, समतेच्या, संवादाच्या आणि अहिंसेच्या नव्या मूल्यांना स्वीकारण्याचे आह्वान देतो. बुद्धांनी लोकशाहीचा पाया मांडताना संघ, विचारस्वातंत्र्य, मतभेदांचा सन्मान आणि सार्वत्रिक करुणा या तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले. आजच्या लोकशाही व्यवस्थेत या मूल्यांची पुन्हा गरज भासते. कारण विचारविनिमयाऐवजी संघर्ष, सहिष्णुतेऐवजी कट्टरता आणि मानवी हक्कांऐवजी नियंत्रणवाद वाढताना दिसतो आहे. म्हणूनच बोधी दिन आपल्याला सांगतो की समाजाची उभारणी वर्चस्वावर नाही, तर सहजीवनावर होते.

याच संदर्भात बुद्धांनी समाजातील सर्वात उपेक्षित घटक म्हणजेच महिला, शूद्र, वंचित, संघर्षग्रस्त आणि पीडित घटकांमध्ये मानवी समानतेचे तत्त्व पहिल्यांदा प्रत्यक्षात आणले. समाजातील प्रत्येक जण जात, लिंग, वर्ग, धर्म, व्यवसाय किंवा जन्माच्या आधारे समान आहे हे तत्त्व सामाजिक न्यायासाठी आजही महत्त्वाचे आहे.बोधी दिन हा वर्तमानातील मानसिक आरोग्याच्या संकटांनाही उत्तर देतो.

आधुनिक जीवनशैली वेगवान, स्पर्धात्मक, तणावग्रस्त आणि यांत्रिक झाली आहे. बुद्धांचे ध्यान, सम्यक स्मृती, मन:शांतता आणि प्रज्ञेचे तत्त्व आज जागतिक मानसिक आरोग्य चळवळीचे आधार आहे. जागरूकता, ध्यान, भावनिक बुद्धिमत्ता (ाळपवर्षीश्रपर्शीी, ाशवळींरींळेप, शो-ींळेपरश्र ळपींशश्रश्रळसशपलश) यांचा उगम हा बोधीच्या तत्त्वज्ञानातच आहे.

बोधी दिन आपल्याला पर्यावरणीय जाणीव देखील शिकवतो. बुद्धांनी निसर्गासोबत संघर्ष नव्हे, तर सह-अस्तित्व सुचवले. आज पृथ्वीला हवामान बदल, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास, नद्यांचा मृत्यू, जंगलांचा विनाश आणि प्राणी-मानव संघर्ष या समस्या भेडसावत आहेत. अशावेळी सर्व प्राणी माझेच आहेत हा बुद्धांचा संदेश आजच्या पर्यावरणीय नैतिकतेचा मूळ पाया ठरतो.

याच अर्थाने बोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही तर तो सततच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. बुद्धांनी सांगितले की मनुष्याचे दुःख भाग्याने नव्हे, तर त्याच्या विचारांनी आणि कृतींनी निर्माण होते. म्हणून बदल हवा असेल तर तो आतून सुरू झाला पाहिजे.

आजच्या काळात बोधी दिनाचा संदेश जगभराला एका नव्या सामाजिक कराराची गरज सांगतो तो संदेश म्हणजे, जिथे धर्म हिंसा नव्हे, संवाद निर्माण करतो. जिथे तंत्रज्ञान मानवतेची परिपूर्ती करतो. जिथे समीक्षाशील विचार आणि करुणा एकत्र येतात.

जिथे समाज फक्त विकसित नसतो, तर मनानेही सभ्य असतो. या अर्थाने बोधी ही स्वतःमध्ये एक अंतरिक क्रांती आहे. ती जीवनाच्या संघर्षांना टाळणारी नाही, तर त्या संघर्षांचे स्वरूप समजून शांततेने त्यावर उत्तर शोधणारी आहे. बोधी दिन ही एक जाणीव आहे की जग बदलण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे स्वतःला बदलणे होय.

आज ८ डिसेंबरच्या या दिवशी आपण सर्वांनी स्वतःला विचारावे की आपण जागृत आहोत की फक्त जागे आहोत?

कारण बुद्धांच्या मते, मनुष्य जन्माला येतो, पण मानव बनण्यासाठी त्याला विवेक, करुणा, दया आणि समता अंगीकारावी लागते. बोधी दिन आपल्याला एकच संदेश देतो की, शांती ही बाह्य मिळकत नाही; ती अंतर्मनातून उगम पावलेली प्रज्ञा आहे. आणि हीच प्रज्ञा समाजाला न्याय्य, समतामूलक, शोषणमुक्त आणि सौहार्दपूर्ण बनवू शकते. म्हणून आजच्या या पवित्र दिवशी आपण फक्त स्मरण नव्हे तर अनुकरण करण्याचा संकल्प करूया. कारण जेव्हा प्रत्येक मानव बोधी होईल, तेव्हा जगात खऱ्या अर्थाने सुंदरता, शांती आणि मानवता नांदेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**

**(लेखक, समाजशास्त्र, पाली आणि बुद्धीझमचे अभ्यासक आहेत)**

# शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सी.बी.एस इनामदार पुन्हा उच्च न्यायालयाच्या दारात

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/प्रतिनिधी/**महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात ऑगस्ट २०२५ मध्ये अतिवृष्टीने हाहाकार माजवला होता. राज्यात व विशेषतः मराठवाड्यात तब्बल ३५५ मिमी अतिरिक्त पाऊस पडल्याने २६ जिल्ह्यांतील जवळपास ५५ लाख शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान झाल्याची नोंद शासना कडे आहे.या पार्श्वभूमी वर शेतकऱ्यांना योग्य त्या भरपाईसाठी शासनाने विविध काळात जाहीर केलेले निर्णय व वास्तविक वाटप यामधील तफावत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

शासन निर्णयांतील बदल नुकसान भरपाईतील तफावत शासन निर्णय १३ मे २०१५ (२०१५/४०/३) नुसार जिरायत ६८००,बागायत १३,५०० आणि फळबाग १८,००० रुपये प्रति हेक्टर (१ हेक्टर मर्यादा) देणे अपेक्षित होते.परंतु शासनाने सरसकट ६८०० रुपये वाटप केले.दि.२९ ऑगस्ट २०१९ शासन निर्णय (देवेंद्र फडणवीस कार्यकाळ) शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम न देता सरसकट ६८०० रु. देण्यात आले.या तफावती विरोधात माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठान यांनी जनहित याचिका दाखल केली.२१ ऑगस्ट २०१९ रोजी माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने जिरायत २०,४००, बागायत ४०,५००, फळबाग ५४,००० (१ हेक्टर) प्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले.हा निर्णय २०२२ पर्यंत कायम होता.शासन निर्णय २०२२/२९७/३ कायम ठेवण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात शासन निर्णय २०२५/२३५ भाग ७ व ८/३ जाहीर करून भरपाई तीनपट करण्यात आली. जिरायत - ६१,२०० रु.बागायत - १,२१,५०० रु.फळबाग - १,६२,००० रु.मर्यादा ३ हेक्टरपर्यंत वाढवून २०२६ पर्यंत हा निर्णय लागू ठेवण्यात आला.परंतु प्रत्यक्षात ८५०० रुपये सरसकट वाटप करण्यात आले,ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली.

या अन्यायाविरुद्ध माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठान, नाव्होली यांनी पुन्हा उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठाकडे धाव घेतली.

सी.बी.एस.इनामदार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) किसान सेल बीड जिल्हाध्यक्ष,यांनी ही याचिका दाखल केली असून लोकसभा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी यास पाठिंबा दिला आहे.

न्यायालयाने याचिका स्वीकारून शासन आणि मुख्य सचिवांना नोटीस जारी केली असून,नुकसान भरपाईची प्रत्यक्ष मर्यादा कशा पद्धतीने ठरवली त्याचे लेखी प्रतिज्ञापत्र ६ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करा असा आदेश दिला आहे.

अतिवृष्टीमुळे संपूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या महाराष्ट्र व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मा. न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे दिलासा मिळाला असून,शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पूर्ण आणि निकषानुसार नुकसान भरपाई मिळेल का?याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# केज येथील नालंदा विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**के ज/प्रतिनिधी/**के ज शहरातील महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नालंदा विद्यालयात महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. नंदकुमार मस्के होते, तर प्रमुख वक्ते म्हणून श्री. नवनथ कांबळे उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दीप, धूप व पुष्पांद्वारे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रस्ताविक सचिन वाघमारे यांनी केले, तर विद्यार्थी प्रतिनिधी आर्यन बचके यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले.ज्येष्ठ शिक्षक कांबळे एन. व्ही. यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग आणि भारतीय संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक श्री. मस्के यांनी डॉ. आंबेडकरांच्या शिक्षण, सामाजिक कार्य आणि बहुजन समाजासाठी केलेल्या योगदानाचे विवेचन केले.त्यांनी डॉ. आंबेडकर यांनी सुरू केलेले वर्तमानपत्र, जलधोरण प्रकल्प, शिक्षण संस्था व हिंदू कोड बिल यांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना महापुरुषांचे आदर्श पाळण्याचे आणि देश व समाजासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ाघमारे एस. बी., कदम एस. एस., बडे ऐ. टी., श्रीमती गुरमे टी. एम. यांचा सहकार्य लाभले, तर सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वाघमारे सर यांनी सर्वांचे आभार मानले.

# जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात दि.१५ व १६ रोजी व्यसनमुक्तीचा जागर; जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** वर्षाअखेर निमित्त होणाऱ्या युवकांच्या मद्यपार्ट्या तसेच समाजामध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढत असून त्याविरोधात कायदेशीर कारवाई सोबतच जनजागृती करणे आवश्यक आहे.




त्यासाठी येत्या सोमवार दि.१५ व मंगळवार दि.१६ रोजी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात व्यसनमुक्तीचा जागर केला जाईल,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा रुग्णालयाचे डॉ. महेश लड्डा तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात अंमली पदार्थ मिळण्याची ठिकाणे शोधणे, प्रतिबंधित औषधांची विक्री थांबवणे, युवकांना व्यसनांच्या जाळ्यात अडकविण्याच्या उद्देशाने कार्यरत अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करणे अशा विविध उपायांबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. शेतीत गांजा लागवड करणाऱ्यांविरुद्ध धडक मोहिम सुरु करण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, वर्षाची अखेर ३१ डिसेंबर या दिवशी मोठ्या प्रमाणावर पार्ट्या करुन मद्यपान वगैरे प्रकार होत असतात. अनेक महाविद्यालयीन युवकांचा त्यात भरणा असू शकतो. त्या पार्श्वभुमिवर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात सोमवार दि.१५ व मंगळवार दि.१६ रोजी व्यसनमुक्तीचा जागर करण्यात येईल.

सर्व महाविद्यालयांमध्ये व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगून जनजागृती करण्यात येईल,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. या उपक्रमासाठी उपसंचालक उच्च शिक्षण यांनी पुढाकार घ्यावा,असेही त्यांनी निर्देशीत केले.


## कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

**यांचे कार्यालय**

**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**

महाराष्ट्र शासन **ई-मेल** - aurangabad.eemahapwd.gov.in **दुरध्वनी ०२४०-२३३१०२२**

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०२४/प्र.क्र.१४४ / इमा-२ दिनांक - २८/०२/२०२४**

**ई निविदा सूचना क्रं. ३२८ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in

२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)

३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

जिमाका /छ.स.न.जाहि/ ४६६/ २०२५ २०२६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**


# पिशोर येथे महामानवांना अनोखी मानवंदना

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २८ नोव्हेंबर रोजी थोर समाजसुधारक, स्त्रीशिक्षणाचे प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यस्मरणाबरोबरच ६ डिसेंबर रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दुःखी-पीडितांचे तारणहार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तसेच लोकनायक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्मृतिसोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.




या सोहळ्याचे औचित्य साधून कनिष्ठ महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्राध्यापक जयवंतराव श्रीराम पाटील यांनी विद्यालयाच्या दर्शनी फलकावर स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या आकर्षक प्रतिमा रेखाटून या महापुरुषांना अनोखी व मनोभावे मानवंदना दिली.

विशेष म्हणजे, प्रा. पाटील यांना चित्रकलेचे कोणतेही औपचारिक प्रशिक्षण नसून, केवळ आपल्या छंदातून ते सामाजिक व ऐतिहासिक महापुरुषांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. विविध जयंती, पुण्यतिथी, तसेच सण-उत्सवानिमित्त ते शाळेच्या फलकावर सुंदर चित्रे रेखाटून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृती, प्रेरणा आणि इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण करतात.

प्रा. पाटील यांच्या या उपक्रमाचे संस्था अध्यक्ष के. आर. नवले, प्राचार्य एन. आर. नवले, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व प्राध्यापक वृंद यांनी मनापासून कौतुक करत त्यांना सतत प्रोत्साहन दिले आहे.

# भटक्या श्वानांना द्यावयाच्या आश्रय, खाद्य, वैद्यकीय उपचार सुविधांसाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा- जिल्हाधिकारी स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असून त्याअनुषंगाने आपापल्या कार्यक्षेत्रातील भटक्या श्वानांना आश्रय, निवारा, तसेच खाद्य देण्याच्या जागा निश्चित करा, त्यांचे निर्बिजीकरण करुन वैद्यकीय उपचार सुविधा देण्याच्या व्यवस्था निर्माण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम राबवा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सहा. आयुक्त पशुसंवर्धनडॉ. रमण इंगळे, जिल्हा उपायक्त पशुसंवर्धन डॉ. नानासाहेब कदम आदी यावेळी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयातने भटक्या श्वानांच्या बाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिले असून त्यानुसार भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंत निर्मूलन करणे, त्यांच्यासाठी आश्रय, निवाऱ्याची सोय करणे, त्यांना खाण्यासाठी ठिकाण निश्चित करुन तेथेच खाद्य उपलब्ध करुन देणे व इतर मोकळ्या ठिकाणी खायला देणाऱ्या विरुद्ध दंडात्मक कारवाई करणे, भटक्या श्वानांबाबत नागरिकांच्या तक्रारींकरीता हेल्पलाईन क्रमांक विकसीत करणे, तक्रारींचे निराकरण लवकरात लवकर करणे, सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारावे, तसेच सार्वजनिक रुग्णालयात ॲंटी रेबीज लस तसेच इम्युनोग्लोबुलिनचा साठा अनिवार्य करावा. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांनी यानिर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत समन्वय अधिकारी म्हणून नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बसस्थानके, क्रीडा संकूल अशा सार्वजनिक ठिकाणी आढळणाऱ्या भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करणे,लसीकरण करणे, लसीकरणानंतर नियुक्त निवाऱ्यात हलविणे अशा प्रकारे व्यवस्था करावयाचे आहे.



जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, या उपाययोजना करण्यासंदर्भात सर्व नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिका यांनी कालबद्ध कार्यक्रम राबवावा. भटक्या कुत्र्यांचे आश्रय, निवारे यांची माहिती जाहीर करा. तसेच त्यांचे खाद्य द्यावयाचे ठिकाणही जाहीर करा. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. हेल्पलाईन क्रमांक विकसीत करुन तो ही नागरिकांसाठी जाहीर करावा,असे निर्देश दिले.

# जरंडीमध्ये लोकसहभागातून नदीपात्र खोलीकरण; दहा वनराई बंधाऱ्यांचे बांधकाम

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी/** सोयगाव तालुक्यातील जरंडी गावात लोकसहभागातून खडकी नदीच्या पात्राचे खोलीकरण आणि दहा वनराई बंधाऱ्यांचे बांधकाम करण्यात आले. शनिवारी (दि. ६) ग्रामस्थांनी एकत्र येत केलेल्या या श्रमदानामुळे नदीपात्रात पाणीसाठा वाढून परिसरातील वन्यप्राण्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे, तसेच मधुकर पाटील, मधुकर सोनवणे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, स्वयंसेवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पाऊस झाला तरी पाणीस्रोत आटण्याचा धोका**

यंदा पावसाचे प्रमाण चांगले असले तरी पाऊस थांबताच ओढे, ओहोळ आणि लहान झरे आटू लागले आहेत. भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या पाणीटंचाईची जाणीव ठेवून ग्रामस्थांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

नदीचे खोलीकरण व वनराई बंधाऱ्यांमुळे वाहून जाणारे पाणी अडवून साठवण क्षमता वाढणार आहे, तसेच शेतीला पाणी मिळणे आणि वन्यजीवांची तहान भागणे याला मोठी मदत होणार आहे.




**ग्रामपंचायतीचे उपक्रम कौतुकास्पद**

जरंडी ग्रामपंचायत सतत विविध लोकोपयोगी उपक्रम राबवत आहे. त्यात-रात्रगस्त ग्रामस्थांच्या सोयीप्रमाणे नियमित बैठका वनविभाग-आपल्यादारी मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम सोशल मीडियाद्वारे जनजागृती वनवा (जंगलात लागणारी आग) प्रतिबंध मोहिमा ,निसर्ग संवर्धन उपक्रम या सर्व उपक्रमांमुळे ग्रामस्थांमध्ये जागरूकता वाढत असून पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.श्रद्धेने आणि श्रमदानातून पार पडलेल्या या उपक्रमात संतोष पाटील, सतीश बाविस्कर, अंबु राठोड, सिद्धार्थ दांडगे, भास्कर निकम, अनिल शिंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले.

# प्रमाणित बियाणे वितरणाकरिता अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत देशातील खाद्यतेलांचे उत्पादन वाढविणे व शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी उन्हाळी हंगाम २०२५ साठी भुईमुग आणि तिळ पिकांसाठी १०० टक्के अनुदानावर प्रमाणित बियाणे वितरणाची योजना राबविण्यात येत आहे.या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भुईमुग पिकाचे तर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तिळ पिकाचे प्रमाणित बियाणे मोफत देण्यात येणार आहे. भुईमुगसाठी हेक्टरी १५० किलो आणि तिळासाठी हेक्टरी २.५ किलो इतके प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर ते जास्तीत जास्त १ हेक्टर क्षेत्रापर्यंत लाभ देण्यात येईल. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांकडील भुईमुग बियाण्याचे २० किलो किंवा ३० किलो पॅक तर तिळ बियाण्याचे ५०० ग्रॅम किंवा १ किलो पॅक उपलब्ध आहेत. क्षेत्रानुसार आवश्यकतेपेक्षा पॅकिंग साईजमुळे बियाणे अधिक झाल्यास त्यातील जादा बियाण्याची रक्कम शेतकऱ्यांना स्वहिश्याने भरावी लागणार आहे.

प्रमाणित बियाण्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in ’FarmeragriLogin या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे. ‘प्रमाणित बियाणे वितरण प्रात्यक्षिके, फ्लेक्झी घटक - औषधे व खते’ या टाईलमध्ये अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्ज करण्यासाठी agristack पोर्टलवर नोंदणी बंधनकारक आहे.

लाभार्थी निवड लक्षांकाच्या अधीन राहून प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (ICFS) या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

त्यामुळे योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक सर्व शेतकरी बांधवांनी तात्काळ अर्ज सादर करून प्रमाणित बियाण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# सिंहावलोकननववर्ष संकल्पनांचे

वर्ष नवे, हर्ष नवे म्हणत प्रारंभी अर्थात नववर्ष दिनी आखलेल्या योजना आणि केलेले संकल्प किती प्रत्यक्षात आले याचे सिंहावलोकन करण्याचा काळ म्हणजे सरता डिसेंबर महिना डिसेंबर महिन्याचा पहिला आठवडा देखील आता संपला आहे. त्यामुळे हे काम करायलाच हवे आणि सिंहावलोकन करताना स्वत:ला आरसा दाखवावा जवळपास केलेले संकल्प हे केवळ नव्याचे ९ दिवस म्हणत वर्षाच्या दुसऱ्या महिन्यापर्यंत टिकले नाही हे जाणवेल.

ज्यांनी नेटाने संकल्प केले त्यांचे यानिमित्त विशेष अभिनंदन देखील करावेच लागेल. बोलायला पैसे थोडेच लागतात म्हणत मोठ्या प्रमाणात संकल्प केले जातात ही आपली मानसिकता आहे. मात्र अंथरुण पाहून पाय पसरावेत या उक्तीप्रमाणे हे संकल्प होत नाही, म्हणून हे संकल्प टिकत नाहीत. आपल्या आरोग्यासाठी किमान रोज १० हजार पावलं चालायची हा संकल्प आणि याला कारण अर्थातच प्रत्येकाच्या हातात आलेले ’स्मार्ट वॉच’ आणि मोबाईल होय. यात आपण चाललेली पावलं मोजली जातात आणि त्याचा महिनावार आलेख ही जपला जातो. प्रत्यक्षात उद्दीष्ट किमान २ हजार पावलं असे सुरू करून पुढील प्रत्येक महिन्यात १ हजार पावलं वाढवली तर हे उद्दीष्ट आवाक्यात येऊ शकते.

कोरोना नंतर आलेल्या ’न्यू नॉर्मल’ ने आरोग्याचे खूप महत्व आहे याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला झाली. यामुळे मोठ्या प्रमाणावर जागरूकता आली असली तरी मनुष्य स्वभावाचा स्थायी भाव बदलत नाही.

परिणामी जूने जाऊ द्या मरणालागुनी या उक्तीचा प्रत्यय येवून सर्वांचे न्यू नॉर्मल आता पुन्हा पहिले पाढे पंचावन्न या उक्तीवर येत आपण जुन्या सवयींकडे वळलो हे जाणवेल.आजच्या धकाधकीच्या युगात आयुष्याची वृद्धी होण्यासाठी आरोग्य संपन्न राहण्याची गरज आहे. ताण-तणावापासून दूर राहण्याची गरज आहे, असे असताना आपण स्पर्धेत धावतोय यामुळे डळषश थींज्ञ इरश्ररपलश ढासळलाय याचा थेट परिणाम आपल्या जीवनशैलीवर आणि पर्यायाने आरोग्यावर झालेला आहे. मोबाईलवर आरोग्यदायी पावलं मोजण्याचा संकल्प प्रत्यक्षात डोळ्यांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या ’रिल्स’ बघण्यात कधी बदलला हे कळलच नाही, ही वस्तुस्थिती आहे. ’रिल्स’ हा प्रकार तसा मनोरंजक असला तरी बघण्याचे भान आपले आहे. आपण किती काळ त्यासाठी देणार हे आपणच ठरवायच बघणारे मात्र भान हरपून बघत बसतात.

रिल्स बनविण्याचे आणि त्यातून पैसा कमावण्याचे वेड अतिशय भयानकत्यापायी जीव धोक्यात घालणारे आणि जिवाला मुकलेले यांची संख्या दिवसागणीक वाढत आहे. कामाचा ताण कमी व्हावा यासाठी रिल्स बघणे हा उपाय नाही. कामाचा ताण कमी करण्यासाठी कामाचे व्यवस्थापन आणि वेळेचे नियोजन या दोन महत्वाच्या बाबी आहेत. काम करताना त्यांचा प्राधान्यक्रम ठरविणे ही सर्वात महत्वाची बाब आहे. प्राधान्यक्रम ठरवून कामाला वेळेत पूर्ण करण्याची सवय लावून घेतल्यास कामाचा ताण न येता काम केल्याचे समाधान मिळते.

आपण कोणत्या भूमिकेत आहोत आणि त्याची मागणी काय आहे याचा अभ्यास आणि सराव अभिनेते करीत असतात. सराव उत्तम झाल्यास सादरीकरण उत्तम होते. त्याच पद्धतीने कामाचा अभ्यास केला पाहिजे. प्राधान्यक्रमानुसार त्याला वेळ दिल्यास आपण काही कालावधीनंतर तेच काम सहजरित्या कमी वेळात पूर्ण करू शकतो. एकदा यात यश मिळाले की, आपोआप आत्मविश्वास वाढतो आणि कामाप्रती सकारात्मकता देखील वाढते.

थींज्ञ डळषश इरश्ररपलश दाखवणारे तक्ते आपणास मोबाईल मध्येच बघायला मिळतील. कोणत्या बाबीसाठी किती वेळ आपण दिला याचा आलेख मोबाईल ठेवतो. या ’सोशल मीडिया’ साठीचा काळ अधिक असेल तर आपले कामावरील लक्ष कमी होत आहे हे लक्षात घ्यावे.

कोणतेही तंत्रज्ञान नाण्यासारखे असते याला सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन बाजू असतात. मोबाईलच्या तंत्रज्ञानाने आपले संपर्काचे रुपांतर कार्यवृद्धीत करायला हवे मात्र त्याची दुसरी बाजू ही कामाची गती कमी करणारी आहे. मोबाईल संपर्काचे साधन आहे पण वाहन चालवताना मान वाकडी करून त्यावर संभाषण करण्याची तातडी नक्की आहे का ?, असे करून आपण धोका आमंत्रित करीत आहोत याचीही जाणीव आपण ठेवत नाही.जय आणि विरूचा शोले आजही ताजा आहे.

अद्याप त्यात जयचे नाणे दोन्हीकडून ’हेड्स’ दाखवते याचा खुलासा शेवटी होतो. आपण मोबाईलचा वापर तसा तर करीत नाही नाही हे या निमित्ताने आपण स्वत:ला विचारण्याची वेळ आता आली आहे.कोरोना नंतरच्या न्यू नॉर्मल मध्ये नोकरी सोडण्याची एक मोठी लाट आयटी क्षेत्रात आली.

कारण सर्वांना जगलं पाहिजे याचं भान आलं. मात्र आजही पिढी पुन्हा स्पर्धेत धावायला लागली आहे हे देखील तितकेच खरे आहे.

आता सिंहावलोकन करताना नवीन संकल्पांची तयारी देखील करा आणि येत्या नववर्ष दिनी साध्य असा संकल्प कराकरताय ना सुरुवात...!

**-प्रशांत दैठणकर**

# संक्षिप्त

## ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध- प्र. अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे असे आहे. तसेच ग्राहकांच्या तक्रारींची त्वरित सोडवणूक करणे हे देखील परिषदेचे कार्य आहे. या उद्देशांसाठी, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेने ग्रामीण भागात विविध माध्यमांद्वारे ग्राहक जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच जालना जिल्ह्यातील ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी केले आहे.जिल्ह्यातील ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक प्रभारी अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सचिव सविता चौधर यांच्यासह ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते.

सध्या अनेक विभागांनी तक्रारी नोंदवण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ग्राहकांनी या सुविधेचा वापर करून आपल्या तक्रारी ऑनलाइन नोंदवाव्यात. तसेच, पळल.क्षरश्रपर या संकेतस्थळावर ग्राहकांच्या समस्यांसाठी पोर्टल उपलब्ध आहे. ग्राहकांच्या हिताशी संबंधित तक्रारी असल्यास त्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने सादर कराव्यात, जेणेकरून त्यांच्या समस्यांचे निराकरण लवकरात लवकर केले जाईल. जिल्ह्यात राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार असून सर्व सदस्यांनी ग्राहक दिन साजरा करण्याबाबत आपल्या संकल्पना सांगाव्यात. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अशासकीय सदस्यांनी दाखल केलेल्या तक्रारींचे समाधान करुन निराकरणही करण्यात आले.

## जनजागृती, समन्वय आणि अंमलबजावणी या त्रिसूत्रीवर काम केल्यास अपघातांना आळा बसेल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** जिल्ह्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी जनजागृती मोहिम राबाविणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच रस्ते अपघात रोखण्यासाठी पोलिस, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वय ठेवून काम करावेत. जनजागृती, समन्वय आणि अंमलबजावणी या त्रिसूत्रीवर काम केल्यास जिल्ह्यातील अपघातांना निश्चितच आळा बसेल, असे प्रतिपादन अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी यांनी केले.

जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने नुकतीच एक महत्त्वाची रस्ता सुरक्षा विषयक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस प्र.अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता स्मिता पवार यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

अपघात कमी करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तरुणांमध्ये सुरक्षित वाहतूक नियमांबद्दल जागरूकता निर्माण करणे हे दीर्घकालीन सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे ठरेल. केवळ नियम बनवून चालणार नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणी आणि अपघात प्रवण ठिकाणे सुधारण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्ह्यात घडलेल्या मोटार वाहन अपघाताच्या प्रकरणाचा मागील तीन वर्षातील संख्येचा आढावा घेण्यात आला.

## संत संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/**संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. प्र.अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार सतिश तायडे, दिपाली वानखेडे, रविंद्र हेलगट, संपदा कुलकर्णी, मिनाक्षी देवशी, मिना नगरकर, सविता भोकरे, सुनिल काळुंके यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

## नन्हू गुलाब शहा फकीर यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/**चाळीसगाव तालुक्यातील बाणगाव येथील रहिवासी व माजी सरपंच नन्हू गुलाब शहा फकीर (वय ८०) यांचे राहत्या घरी दिनांक ०६ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९ वाजता दुःखद निधन झाले.त्यांचा दफन विधी बाणगाव येथील कब्रस्तानात ०७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.ते महाराष्ट्र पत्रकार जनसेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांचे गंगापूर तालुका अध्यक्ष सुभान शहा (पत्रकार) यांचे वडील होते.जर तुम्हाला ही बातमी आणखी संक्षिप्त, विस्तृत किंवा लेआउटसह हवी असेल तर मला सांगा.



## विष्णूपंत बापूजी बुजाडे यांचे दीर्घ आजाराने निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** धामनगाव (ता. बदनापूर) येथील प्रतिष्ठित नागरीक हभप. विष्णूपंत बापूजी बुजाडे (वय ७५) यांचे आज, रविवारी (दि. ७), दीर्घ आजाराने निधन विष्णूपंत बापूजी बुजाडे (वय ७५) यांचे आज, रविवारी (दि. ७), दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी उद्या, सोमवारी (दि. ८), दुपारी १२ वाजता जालना येथील रामतीर्थ स्मशानभूमीत संपन्न होईल.

# भ्रष्टाचार करणाऱ्यांनो सावधान, सीबीआयची करडी नजर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** राष्ट्रीय बँका, पोस्ट ऑफिस, इन्शुरन्स कंपन्या, इन्कम टॅक्स ऑफीस, भविष्य निर्वाह कार्यालय इतर सर्व केंद्रीय कार्यालयात कर्मचारी कुठल्याही कामाच्या मोबदल्यात पैसे मागत असतील तर त्याची तक्रार तुम्ही सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची हेल्पलाइन नंबरवर करू शकता. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांनो सावधान व्हा, सीबीआयची आपल्यावर करडी नजर असल्याचा इशारा सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी सजीष अय्यर यांनी दिला.जालना जिल्हा व्यापारी महासंघ व केंद्रीय अन्वेषण ब्युरो ( सीबीआय) एसीबी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भ्रष्टाचार प्रतिबंध व जागरूकता चर्चासत्राचे आयोजन हॉटेल विजय विलासच्या बँक्वेट हॉलमध्ये करण्यात आले होते.




**सजीष अय्यर : जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे भ्रष्टाचार प्रतिबंध व जागरुकता चर्चासत्र**

चर्चासत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे महासचिव शाम लोया हे होते. प्रस्तावना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी यांनी केले तर महासंघाचे महासचिव संजय दाड, संघटक प्रमुख राजेश राऊत, इंदर तवरवाला, कोषाध्यक्ष विजय राठी व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन विनोद कुमावत यांनी केले.सजीष नायर म्हणाले की, केंद्रीय कर्मचाऱ्यांनी भ्रष्ट मार्गाने मालमत्ता जमा केली असेल व त्याची नागरिकांना माहिती असेल तर त्याची सुद्धा तक्रार आपण या कार्यालयाकडे करू शकता. सीबीआय अँटी करप्शन ब्युरो च्या ट्रॅप मध्ये अडकलेल्या कर्मचाऱ्यांना शिक्षा देण्याचे प्रमाण चांगले आहे असे ही ते म्हणाले. मजबुरीत एखाद्या नागरिकाने एखाद्या कर्मचाऱ्यास लाच दिली व त्याने अँटीकरप्शन ब्युरोला सात दिवसाच्या आत कळवले तर त्याच्यावर कुठलाही गुन्हा दाखल होणार नाही असेही ते म्हणाले.

शाम लोया म्हणाले की, नागरिकाच्या कायद्याच्या अज्ञानाचा सरकारी कर्मचारी कसा फायदा घेतात याचे सोदाहरण त्यांनी स्पष्ट केले. केंद्रीय व राज्य अँटी करप्शन ब्युरोचा भ्रष्ट कर्मचाऱ्यावर अजूनही धाक बसला नसून भ्रष्ट कर्मचाऱ्यास शिक्षेचे प्रमाण फार कमी असल्याची तक्रार उपस्थित व्यापारी वर्गाने सीबीआय अधिकाऱ्याकडे केली. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कठोर शिक्षेची तरतूद करावी व बडतर्फीची कारवाई होत नाही तोपर्यंत या भ्रष्टाचारी लोकांवर कायद्याचा धाक त्यांच्यावर बसणार नाही, अशी ही व्यापारी बांधवांकडून मागणी करण्यात आली. कार्यक्रमास सीए गोविंदप्रसाद मुंदडा, लक्ष्मीनारायण मानधना, विजय बगडिया, सुभाष देविदान, क्रेडाइ संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार, चेतन मराठे, पंकज कासलीवाल रविंद्र हुसे, भोसले, लघुउद्योग भरतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल, अॅड. महेश धनावत, प्रमोद गंडाल, विनोद पवार, योगेश ठक्कर, शहा आदी उपस्थित होते.

## 'मोक्षप्राप्ती म्हणजेच काला' - ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर



**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर (प्रतिनिधी)** मनुष्याने नामस्मरणाच्या साधनेत रमल्यास त्याला जिवंतपणीच मोक्ष प्राप्त होऊ शकतो. 'काला' म्हणजे भगवंताने दिलेला आणि देहातच अनुभवता येणारा जीवनमुक्तीचा प्रसाद असल्याचे अध्यात्मरत्न ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर यांनी प्रतिपादन केले. श्रीक्षेत्र गोंदी येथील श्रीदत्तजयंती महोत्सवाच्या समारोप प्रसंगी आयोजित काल्याच्या कीर्तनावेळी ते बोलत होते.

ह.भ.प. प्रकाश महाराजांनी संत तुकाराम महाराजांच्या 'उपजोनिया पुढती येवू' या अभंगावर मनोगत व्यक्त करत अध्यात्म, नामसाधना व भक्तीमार्गाचे महत्व स्पष्ट केले.गोंदी येथील दत्तमंदिरात श्री गुरु स्वामी स्तवराज चरित्र व श्रीगुरुचरित्र पारायण, गीता-विष्णुसहस्त्रनाम पठण, श्रीदत्तपंचपदी, श्रीमद्भागवत कथा, तसेच मराठवाडा नारदीय कीर्तन महोत्सव अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.श्रीमद्भागवताच्या सप्तम स्कंधाचे रसपूर्ण विवेचन ह.भ.प. प्रदीप महाराज मुळे गोंदीकर यांनी केले. तसेच नारदीय कीर्तन महोत्सवात ह.भ.प. सुहासबुवा रामदासी, ह.भ.प. योगीराजबुवा गोंदीकर, ह.भ.प. श्रीपादबुवा गोंदीकर आदी युवा कीर्तनकारांनी कीर्तनसेवा सादर केली. कीर्तनकारांना श्रीपाद मुळे व सुहास रामदासी यांनी संवादिनी, तर प्रमोद धर्माधिकारी यांनी तबला साथ दिली. ह.भ.प. संकेत महाराज सोळुंके यांनी दररोज प्रवचनसेवा केली.जगातील एकमेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या गोंदी येथील श्री पुष्कराज दत्तमूर्तीस भाविकांनी रुद्राभिषेक, भजन सेवा यांसह भक्तिभावपूर्वक पूजा अर्चा केली. श्रीराम संस्थान साडेगावचे महंत प.पू. सुरेश महाराज रामदासी यांच्या पाद्यपूजेसही भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सात दिवस चाललेला हा भव्य उत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीगुरुदत्तधाम परिवारातील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. विश्वस्त श्रीपाद मुळे तथा कार्यवाह योगीराज मुळे गोंदीकर यांनी सर्व भाविकांचे आभार मानले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य देशासाठी महत्वाचे तर क्रांतिसिंह नाना पाटील प्रति सरकारचे प्रणेते-डॉ.वसुदेव

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/प्रतिनिधी/**स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन व क्रांतीसिंह नाना पाटील यांची पुण्यतिथी व्याख्यान व परिसंवाद कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करूनमान्यवरांच्या हस्ते पुजन व वंदन करण्यात आले.प्रमुख व्याख्याते म्हणून एस.के. वैरागे यांचे छोटेखानी व्याख्यान झाले.त्यानंतर परिसंवाद कार्यक्रम घेण्यात आला.या परिसंवादात वामन गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,रामराजे गायकवाड,अरुण गायकवाड,रमेशराव गायकवाड,ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी सहभाग घेतला.परिसंवादात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य कर्तृत्व व क्रांतिसिंह नाना पाटलांचे कार्य कर्तृत्व यावर परिसंवाद झाला.त्यानंतर अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. देशाच्या जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे योगदान होते तसेच देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटील यांचे मोठे योगदान होते असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.


# निकुंज खंडेलवालला ओपन स्केटिंग चॅम्पियन स्पर्धेत सुवर्ण पदक

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** जालना येथील ऋषि विद्यालयात कौशल बहुउद्देशीय संस्थेतर्फे भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या ओपन स्केटिंग चॅम्पियन स्पर्धेत १२ वर्षांखालील वयोगटात ऋषि विद्यालय एज्युकेशनल स्कूलचा प्रतिभावान विद्यार्थी निकुंज विष्णु खंडेलवाल यांनी दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्ण पदकाची चमक आपल्या नावावर केली.या स्पर्धेत विविध शाळांमधील अनेक बालखेळाडूंनी उत्साहाने सहभाग घेतला होता. स्पर्धेतील ट्रॅकवरील वेग, संतुलन आणि तंत्र या सर्वच बाबतीत निकुंजने उल्लेखनीय कौशल्य दाखवत परीक्षकांचेही लक्ष वेधून घेतले. अंतिम फेरीत निकुंजने उत्कृष्ट वेग राखत अचूक संतुलन आणि आत्मविश्वासपूर्ण स्केटिंगचा नमुना सादर केला. त्याच्या उत्कृष्ट खेळाडूवृत्तीमुळे त्याने इतर स्पर्धकांना मागे टाकत सुवर्ण पदक निश्चित केले.

निकुंजच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ऋषि विद्यालय एज्युकेशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. हेमा सोनटक्के यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, निकुंज सातत्याने कठोर मेहनत घेत असून त्याची ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच, कौशल बहुउद्देशीय संस्थेच्या आयोजकांनीही त्याच्या मेहनतीचे व कौशल्याचे कौतुक करून भविष्यातही अशाच स्पर्धांमध्ये चमक दाखवण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

निकुंजच्या सुवर्ण कामगिरीमुळे संपूर्ण शाळेत आनंदाचे वातावरण असून शिक्षक, सहाध्यायी, पालक यांनी त्याचा अभिमान व्यक्त केला आहे. भविष्यात तो राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांतही चमक दाखवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# फुलंब्री येथे श्री संत शिरोमणी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/ प्रतिनिधी /** फुलंब्री येथे श्री संत शिरोमणी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती उत्साहात साजरी



करण्यात आली.यावेळी मुख्य अभियंता अतुल चव्हाण, भाजपाचे जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाठ, राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हाउपाध्यक्ष .बंटी देशमुख,युवा नेते आनंदा ढोके, देवगिरी कारखान्याचे संचालक,योगेश मिसाळ,

देविदास ढंगारे, गजानन नागरे, बाबासाहेब शिनगारे, संतोष जाधव, .देवराव राऊत, राघू ढंगारे, संजय वाघ, मालोदे, तैलिक महासभेचे शहराध्यक्ष सुरेश मिसाळ, तैलिक महासभेचे युवक तालुका अध्यक्ष वैभव दुतोंडे, तैलिक महासभेचे युवक शहराध्यक्ष अक्षय पाडळकर.

तसेच समाज बांधव . सदाशिव तावडे, .अंबादास तावडे, .जगन तावडे,.उत्तम मामा आढाव, .संतोष काका मिसाळ, रामदास तावडे, .प्रमोद मिसाळ,. मुरलीधर राऊत, .सतिश दुतोंडे, लक्ष्मण तावडे, मधुकर दुतोंडे, .शिवनाथ दुतोंडे, .कांता आढाव,. रामदास आढाव, .रत्नाकर आढाव, .मनेश दुतोंडे, श्री.काशिनाथ दुतोंडे, .गणेश मिसाळ, .भानुदास दुतोंडे, .ताराचंद दुतोंडे, .कृष्णा आढाव, .शरद रोठे, .पूनमचंद दुतोंडे, .सोमनाथ दुतोंडे, .प्रकाश लोखंडे, .राजू वाळके, श्री.अमोल राऊत, विलास तावडे, दुतोंडे, .किशोर दुतोंडे, .अमोल आढाव, .ज्ञानेश्र्वर तावडे पाल,.गजानन तावडे, श्री.उमेश मिसाळ, .रमेश मिसाळ, गंगाधर तावडे, श्री.दिनेश मिसाळ, .रवी आढाव, .विनोद शिंदे, . संभाजी शिंदे, .बाळू आढाव, .संतोष शिंदे, .सुरेश गायकवाड, .नंदू आढाव, .प्रशांत खैरे, .विकास .सुहास दुतोंडे,. संतोष आढाव, श्री.जगदीश मिसाळ, .अमोल मिसाळ,.विजय गंगावणे यांच्या सह आदींची उपस्थिती होती.



## आठवण तुझीच येऊनी जिव रडतो कधी कधी जळतो हा जीव माझा भिमराया कधी कधी!!

आत्ताच एक्सप्रेस

अर्धापूर /प्रतिनिधी /महामानव, भारतरत्न, बोधिसत्त्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा, नांदेड यांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात नांदेड रेल्वे स्टेशन परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. जिल्हा शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने अभिवादन करून त्यांचे स्मरण केले.

यानंतर पुज्यनिय भन्तेजी यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील ग्रहण करून दिले. पुढे पुजापाठ, भिमस्तुती, भिमस्मरण तसेच विविध बौद्ध गाथांचे पठण करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान परिसरात भिमस्मरणाचा भावपूर्ण माहोल निर्माण झाला होता.

या वेळी पुज्यनिय भन्तेजी, नांदेड जिल्हाध्यक्ष युवराज मोरे, पि. एम. वाघमारे, सा. ना. भालेराव, सुभाष नरवाडे, सुरेश लोकडे, पत्रकार उध्दवराव सरोदे, जनार्दन जमदाडे, कृष्णा गजभारे, गायकवाड तसेच नांदेड जिल्हा शाखा आणि तालुका शाखेचे पदाधिकारी, समता सैनिक दलाचे सदस्य, बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813